(12) (45)

**कलम ८१ खालील परंतुकान्वये लेखापरीक्षकांच्या नेमणुका करणेबाबत...**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे कार्यालय**
जा.क्र. सआ/लेखापरीक्षण/परंतुकान्वये लेप नेमणुक/2434/२०१६
दिनांक : 97 /१२/२०१६

**-: परिपत्रक :-**

**संदर्भ:** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र./प्रशासन/कलम ८१(१)(ग)८२/परिपत्र/२५४/२०१५, दि. २२/०८/२०१५
२. या कार्यालयाचे पत्र क्र. सआ/लेप/जिमइनातपइसं/९२४/२०१६, दिनांक ०७/०६/२०१६
३. या कार्यालयाचे पत्र क्र. सआ/लेखापरीक्षण/लेप नियुक्ती/२२१७/२०१६, दि.२९/१०/२०१६

संदर्भांकित परिपत्रक व पत्रांव्दारे राज्यातील जिल्हानिहाय सर्व सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण मुदतीमध्ये पूर्ण करणेबाबत, चालू आर्थिक सहकारी वर्षासाठी अर्हताधारक लेखापरीक्षकांच्या वैधानिक लेखापरीक्षणास्तव नेमणुका करणेबाबत सकल व सविस्तर निर्देश देण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या सुधारीत अधिनियमाव्दारे **संस्था** प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवील अशी तरतूद आहे. परंतु, संस्थेने कलम ७५ चे पोटकलम (२अ) आणि कलम ७९ चे पोटकलम (१ब) अन्वये विहित तरतुदीप्रमाणे लेखापरीक्षकाची नेमणूक करण्यास आणि लेखापरीक्षक नेमणुकीबाबतची विवरणे दाखल करण्यास कसूर केली आहे तेव्हा ती कारणे लेखी नमूद करून संबंधित निबंधक कलम ८१ (१)(अ) खालील परंतुकान्वये नामतालिकेतील एखाद्या लेखापरीक्षकांकडून त्या संस्थेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेणेसाठी लेखी आदेश पारीत करील अशीही तरतुद आहे. सदरहू तरतुदीस अनुसरून परंतुकाखालील लेखापरीक्षणाचे आदेश पारीत करतांना राज्यामध्ये समानता व एकसुत्रता राखली जात नसलेची बाब या कार्यालयाचे निदर्शनास आलेली आहे. तद्नुषंगाने या परिपत्रकाव्दारे परंतुकाखालील लेखापरीक्षणाचे आदेश पारित करतांना, जिल्हा निहाय सर्व संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण व्हावे यासाठी लेखापरीक्षक नेमणुकांमध्ये समानता व एकसुत्रता राखणेस्तव पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. प्रतिवर्षी दिनांक १ नोंव्हेबर पासून कलम ८१ (१)(अ) खालील परंतुकान्वये नियम ६९ (१) (फ) (vii) अन्वये निश्चित केलेली लेखापरीक्षक आणि संस्था याची वर्गवारी विचारात घेवून संबंधित संस्थेच्या

Scanned by CamScanner

लेखापरीक्षणास्तव अर्हताधारक लेखापरीक्षक नेमणुकीचे आदेश कार्यक्षेत्रनिहाय संबंधित निबंधकाने पारित करावेत.

२. संस्थेने कलम ७५ चे पोटकलम (२अ) आणि कलम ७९ चे पोटकलम (१ब) अन्वये विहित तरतुदीप्रमाणे लेखापरीक्षकाची नेमणूक केली नसलेस, अशा संस्थांच्या वार्षिक सर्वसाधरण सभा इतिवृत्तांत नोंदवहीतील ठरावांची पडताळणी करून सदर इतिवृत्त १ नोंव्हेबरपूर्वी अंतिम करावे. जेणेकरून एकाच संस्थेसाठी ठराव व परंतुकान्वये दोन वेगवेगळ्या लेखापरीक्षकांच्या नेमणुका होणार नाहीत याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

३. अशारितीने वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त अंतिम झाल्याची खात्री केलेनंतर ज्या सहकारी संस्था बंद असल्याची संबंधित निबंधकाची खात्री झाली आहे, अशा संस्थांचे लेखापरीक्षणास्तव परंतुकाखालील आदेश पारीत करण्यात येवू नयेत. या सं्स्था अवसायनामध्ये घेण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करावी.

४. संस्थेचे मुख्यालय ज्या तालुका व जिल्ह्यामध्ये नोंदणीकृत आहे, शक्यतो त्याच तालुका व जिल्ह्यातील अर्हताधारक लेखापरीक्षकाची नेमणुक परंतुकाखालील आदेशाने करावी ज्यामूळे भौगोलिक अंतराच्या मर्यादा कमी होवून लेखापरीक्षण पूर्णत्वास वेळेच्या उपलब्धतेमूळे चालना मिळेल.

५. नामतालिकेमधील **अ, ब** व **क** वर्गवारीतील अर्हताधारक लेखापरीक्षकांना नियम ६९ (१) (फ) (vii) अन्वये निश्चित केलेल्या उलाढाल व अकारमान परत्वे **अ, ब** व **क** वर्गवारीतील संस्थांसाठी परंतुकाखालील आदेशाने लेखापरीक्षणास्तव प्राधिकृत करावे.

६. तालुका व जिल्हानिहाय शासकीय लेखापरीक्षक कार्यरत असून ते नामतालिकेवर वर्गवारी निहाय नोंदणीकृत आहेत. परंतुकाखालील लेखापरीक्षणाचे आदेश पारीत करतांना शासकीय लेखापरीक्षकांना प्राधान्य देण्यात यावे.

७. तालुका व जिल्हानिहाय नामतालिकेवरील उपलब्ध **लेखापरीक्षकांची संख्या** व **संस्थांची संख्या** विचारात घेवून नामतालिकेवरील शासकीय लेखापरीक्षक, सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक यांचेकडील लेखापरीक्षण कामकाजाचा समप्रमाणात भार राखला जाईल असे पाहून परंतुकाखालील लेखापरीक्षणाचे आदेश निर्गमित करावेत.

८. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठरावाव्दारे चालू आर्थीक वर्षासाठी लेखापरीक्षणास्तव झालेल्या नेमणुका विचारात घेवून, प्रत्यक्षात ज्या आर्हताधारक लेखापरीक्षकांच्या नेमणुका **ठरावाव्दारे झालेल्या नाहीत अथवा कमी प्रमाणात झालेल्या आहेत**, असे आर्हताधारक शासकीय लेखापरीक्षक, सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षकांना लेखापरीक्षणाचा भार समप्रमाणात राखला जाईल अशा रितीने परंतुकाखालील लेखापरीक्षणाचे आदेश पारित करावेत.

Scanned by CamScanner

९. एक लाखाचे वर वसुल भागभांडवल असणाऱ्या २० संस्थांचे ठराव ज्या लेखापरीक्षकाचे नावे होवून त्यासाठी त्याने संमतीपत्र अदा केलेले आहे, त्या लेखापरीक्षकांना त्या आर्थिक वर्षासाठी १ लाखांचे वर वसुल भागभांडवल असणाऱ्या संस्थासाठी परंतुकाखालील आदेशाने लेखापरीक्षणास्तव प्राधिकृत करण्यात येवू नये.

१०. परंतुकाखालील लेखापरीक्षणाचे आदेश पारीत करतांना एकाच संस्थेसाठी त्याच लेखापरीक्षकाची नेमणुक लागोपाठ तीन वर्षाहून अधिक कालावधीसाठी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. वैधानिक लेखापरीक्षणास्तव परंतुकाखालील आदेश पारीत करतांना संबंधित संस्थेचा परिपूर्ण नोंदणीकृत पत्ता आदेशामध्ये नमूद करावा.

तरी कलम ८१ (१)(अ) अन्वये संस्था त्यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करून घेणेस्तव वार्षिक सर्वसाधारण सभेव्दारे अर्हताधारक लेखापरीक्षकाची नेमणुक करणार नाहीत तेंव्हा संबंधित निबंधकाने सदरहू परिपत्रकाअधिन अ.क्र. १ ते ११ निर्देशांप्रमाणे परंतुकाखालील आदेश पारीत करावेत. अशा रितीने राज्यातील सर्व सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण मुदतीमध्ये पूर्ण होईल असे पहावे.

(चंद्रकांत दळवी)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत पुढील उचित कार्यवाहीस्तव:**

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन व लेखापरीक्षण) सर्व
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव:**

४. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५
६. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी मुंबई.
८. मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन मुंबई.
९. विशेष कार्य अधिकारी, लेखापरीक्षा मंडळ, पदुम महाराष्ट्र राज्य मुंबई.
१०. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. सर्व कार्यासन अधिकारी, सहकार आयुक्त कार्यालय पुणे.
१६. मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.

Scanned by CamScanner